राज्यातील सर्व माथाडी मंडळ व सुरक्षा रक्षक मंडळांचे लेखापरीक्षण करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पॅनलला मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. युडब्ल्यूए-२०१७/प्र.क्र.१४४/कामगार-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०७ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :-१) शासन निर्णय क्र.युडब्ल्यूए-१३१२/प्र.क्र.३२०९/ कामगार-५, दि. १७ जुलै, २०१२.
२) शासन निर्णय क्र.युडब्ल्यूए-१३१२/प्र.क्र.३२०९/ कामगार-५, दि. ६ एप्रिल, २०१३.
३) शासन निर्णय क्र. युडब्ल्युए-१३१२/प्र.क्र. ३२०९/कामगार -५, दि. १८ जानेवारी, २०१७.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम ८ व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ९ नुसार महाराष्ट्रातील कामगार विभागांतर्गत सर्व माथाडी मंडळे व सुरक्षा रक्षक मंडळे यांच्या लेखापरीक्षणासाठी संदर्भाधीन दि. १७ जुलै, २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यपध्दती निश्चित करण्यात आली होती. सदर कार्यपध्दतीनुसार तीन वर्षांकरीता दि. ६ एप्रिल, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार १४ सनदी लेखापरीक्षकांच्या पॅनलला तीन वर्षाच्या कालावधीकरीता म्हणजेच दि. ०५/०४/२०१६ पर्यंत मान्यता देण्यात आली होती. तथापि या विहीत मुदतीनंतरही माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळांच्या लेखापरीक्षकणाचे कामकाजासाठी पॅनलची आवश्यकता असल्याने प्रस्तुत पॅनलला दि. ३०/०४/२०१७ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती. प्रस्तुत कालावधीनंरही विविध माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळांचे लेखापरीक्षकणाचे कामकाज प्रलंबित असल्याने सदरहु लेखा पॅनलला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासंदर्भात शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

दि. ६ एप्रिल, २०१३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे गठीत करण्यात आलेल्या लेखा पॅनलला दिनांक १ मे, २०१७ पासून ते ३० नोव्हेंबर, २०१७ पर्यंत सहा महिन्यांच्या कालावधीसाठी पुढील अटीच्या अधीन राहून, मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर मुदतवाढीच्या कालावधीत सर्व माथाडी/

सुरक्षा रक्षक मंडळांचे अद्ययावत लेखापरीक्षणाचे काम पूर्ण करुन अहवाल शासन मान्यतेस्तव सादर करण्याबाबत कामगार आयुक्त यांचेस्तरावर एक विशेष मोहिम राबविण्यात यावी व मंडळाचे सन २०१६-१७ पर्यंतचे लेखाअहवाल पूर्ण करुन ते सन २०१७ च्या हिवाळी आधिवेशनापर्यंत पटलावर ठेवण्यासाठी शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७११०७१२१६४७६४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Sanjay Vithoba Kalbhor
Date: 2017.11.07 16:25:12 +05'30'

(संजय काळभोर)
कार्यासन अधिकारी

प्रत :-

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई (पत्राने)
२) मा.मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.मंत्रालय, मुंबई.
४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, अ-६,मंत्रालय समोर, नरिमन पॉईंट, मुंबई.
५) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक.मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक, मुंबई.
१०) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, सी-२०,ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व),मुंबई.
११) सह कामगार आयुक्त,कामगार भवन, सी-२०,ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व),मुंबई.
१२) कामगार उप आयुक्त, कामगार भवन, सी-२०,ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व),मुंबई.
१३) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१४) अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक /माथाडी मंडळे.
१५) सर्व कार्यासने, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) निवड नस्ती (कामगार-५).